बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

**माहिती कक्ष, दि १० ऑगस्ट २०२३**

# एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५३१/२०२३ भादवि ३२४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०९/०८/२०२३ रोजी २१.०० वा चे सुमारास सिंधुराम हाईटस समोर कर्णिक नगर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १०/०८/२०२३ रोजी ०५.१७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सिद्राम नागनाथ देसाई,वय-२४ वर्षे,रा- ३१,भैय्या वस्ती नागनाथ मंदिर कर्णिक नगर सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) मोहनसिंग गुंगीवाले,२) वचन गुंगीवाले. रा- सोलापूर. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे डाबरी रस्त्यावर थांबले असता आरोपी क्र २ हा फिर्यादीस तु माझ्या बापाला का शिवीगाळ केली या कारणावरून फिर्यादीची गच्छी पकडले व आरोपी क्र १ यांने फिर्यादीस शिवीगाळ करत तुला लय मस्ती आली आहे का अशी दमदाटी करून हाताने मारहाण केली तसेच आरोपी क्र २ यांने अपार्टमेंटच्या कंम्पाऊड जवळ पडलेली लोखंडी सळई हातात घेवून फिर्यादीचे डोक्यात मारून जखमी केले आहे.म्हणून.तपास- पोह/९३४/नवले- ९४२३९९२५३२ |

# एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५३२/२०२३ भादवि ३२४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०९/०८/२०२३ रोजी २१.०० वा चे सुमारास सिंधुराम हाईटस समोर कर्णिक नगर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १०/०८/२०२३ रोजी ०५.३३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | मोहनसिंग विठ्ठलसिंग गुंगीवाले,वय-६० वर्षे,रा- सिंधुराम हाईटस समोर कर्णिक नगर सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) सिद्राम देसाई,२) सुरेश गायकवाड,३) दिनेश मुतकोड सर्व रा- नागनाथ मंदिराशेजारी भैय्या वस्ती सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी वॉचमन डयुटीवर असताना गेटजवळ यातील आरोपीत मजकूर हे येवून आरोपी क्र १ हा फिर्यादीस मला अपार्टमेंट मध्ये दुसऱ्या मजल्यावर जायचे आहे त्यावेळी फिर्यादी त्यास कोणाकडे जायचे आहे असे विचारले असता त्यांनी फिर्यादीस शिवीगाळ करून दमदाटी केली व फिर्यादीचा मुलगा वचन यास आरोपी क्र २ व ३ यांनी त्यास हाताने मारहाण करून फिर्यादीस आरोपी क्र १ याने जवळच्या लाकडी वाश्याने हाताचे बोटावर,डोक्यावर,कपाळावर मारहाण केली आहे.म्हणून.तपास- पोह/५१२/गायकवाड |

# जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४०४/२०२३ भादवि ३२४,३२३,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०८/०८/२०२३ रोजी १५.०० वा . मंगळवार बाजार सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १०/०८/२०२३ रोजी १८.०२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | शेखर अर्जुन जगताप,वय-३४ वर्षे,रा- कौतम चौक धाकटा राजवाडा सोलापुर |
| **आरोपीचे नाव** | : | १) रेखा बादल गायकवाड,२) बादल गायकवाड,३) व त्यांची मुलगी नाव माहित नाही. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे मंगळवार बाजार येथे मासे विक्री करणेकरीता गेले असता फिर्यादी हे नेहमी मासे विक्री करण्याकरीता नेहमी बसत असलेल्या ठिकाणी यातील आरोपी क्र १ ही बसली होती फिर्यादी त्याचे शेजारी मासे विक्री करीत बसले असता आरोपी क्र १ हिने फिर्यादीस तु येथे बसायचे |

| | | |
|---|---|---|
| | | नाही म्हणून फिर्यादीचे आणलेले सर्व मासे रस्त्यावर टाकून दिले.त्यावेळी फिर्यादी व फिर्यादीची आई सुनिता जगताप ही आरोपीतांना समजावून सांगत असताना आरोपी क्र १ हिने फिर्यादीचे यांचे डावे हाताचे पोटरीवर सत्तुरने मारहाण केल्याने फिर्यादीचे डावे हाताचे पोटरीवर जखम झाली तसेच आरोपी क्र २ व ३ यांनी फिर्यादीच्या आईस लाथाबुक्यांनी मारहाण केली आहे.म्हणून.तपास- पोह/९९३/पैकेकरी-७४१०११२९९३ |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५३२/२०२३ भादवि १४३,१४७,१४८,१६०,३२४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १०/०८/२०२३ रोजी १६.३० वा. बिग बझार सातरस्ता सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १०/०८/२०२३ रोजी २३.५५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | पोकॉ/१४०१/मारुती जालींदर चंदनशिवे,नेम- सदर बझार पो.स्टे सोलापुर शहर |
| **आरोपीचे नाव** | : | १) प्रविण संगमेश्वर कट्टीमणी,२) अजय महादेव मोटे, ३) विजय महादेव मोटे, ४) साईनाथ अंबादास जाधव, ५) साहिल सुनिल गायकवाड, ६) रोहित सुनिल बनसोडे ७) प्रतिक पुर्ण नाव माहित नाही ८) ओंकार पुर्ण नाव माहित नाही.,९) इतर ५ ते ७ इसम. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे कर्तव्यावर असताना वरील ठिकाणी यातील आरोपीत क्र १ यांचे आरोपीत क्र ४ यांने ३०० रूपये घेतले होते सदर पैसे आरोपीत क्र ४ यांने परत दिले नसल्याने आरोपी क्र १ व ४ यामध्ये तक्रार झाली त्यावरून दोघांनी आपआपले भागातील मुले बोलावून सदरची हाणामारी केली आहे त्यामध्ये आरोपी क्र ३ यांचे डाव्या हाताचे पंचाला पाठीत आरोपी क्र ४ यांचे उजव्या पायाचे नडगीला,आरोपी क्र १ यांचे तोडाला आरोपी क्र ५ याचे डोक्यास,आरोपी क्र ६ यांचे डोकयास जखम झालेल्या आहेत तरी वरील आरोपीतांनी बेकायदेशीर जमाव जमवून सार्वजनिक शांतता भंग केली म्हणून.तपास- पोह/४९७/चव्हाण-९८८१४९७६१७. |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३०९/२०२३ भादवि ४०६,४२०,५०६ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | जुलै २०२१ ते ऑगस्ट २०२१ रोजी दरम्यान गाळा नं जी १३५,मार्केट यार्ड सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १०/८/२०२३ रोजी २१.४७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | मुजीब निसार अहमद खलिफा,वय-४३ वर्षे,रा- २९३,साखर पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | आर अक्किनेश्वर ऊर्फ अग्नी रा-तामिळनाडू राज्य तामिळनाडू. |
| **फसवणुक रक्कम** | | ४६,८४,२२९/-रुपये. |
| **हकिकत** | | यात हकिकत अशी की, यातील फिर्यादी यांचे मार्केट यार्ड येथे कांदा खरेदी-विक्री चे दुकान असून फिर्यादीची सन २०१५ पासून आर अक्किनेश्वर ऊर्फ अग्नी यांच्याबरोबर कांदा खरेदी विक्रीचा व्यवसाय चालू आहे. सन २०१९ ते सन २०२० पर्यत आर अक्किनेश्वर ऊर्फ अग्नी यांनी कांदा खरेदी केलेल्या पैशाची रक्कम फिर्यादीच्या खात्यावर वेळोवेळी जमा करत असे त्यामुळे फिर्यादीचा विश्वास संपादन झाला होता.<br>वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीने वेळोवेळी आर अक्किनेश्वर ऊर्फ अग्नी यांस सोलापूर मार्केट यार्ड येथील southern roadways ट्रान्सपोर्टचे मालक नूर अन्वर खडके यांचे ट्रान्सपोर्टव्दारे कांदा पाठविला होता.सदर बिलाची रक्कम ४६,८४,२२९ /-रूपये झाली होती.<br>फिर्यादीने वेळोवेळी दिलेल्या कांदयाचे बिलाची रक्कम वेळोवेळी मागण्याकरीता मो क्र ९८२२३४७१०५ यावरुन वारंवार फोन करुन पैशाची मागणी केली असता वरील आरोपीत यांने मी तुमचे कांदा खरेदी केलेल्या बिलाची रक्कम देणार नाही तुम्हाला काय करायचे ते करा असे म्हणाले.त्यानंतर माहे ऑगस्ट २०२१ नंतर |

| | | |
|---|---|---|
| | | फिर्यादी व फिर्यादीचा भाच्चा अशपाक सैफनसाब बागवान असे मिळून तमिळनाडू राज्यातील पोलाची गावातील गांधी मार्केट या ठिकाणी गेलो असतो आरोपीतास फोन केला असता वरील आरोपीत यांनी मी तुमचे कांदा खरेदी केलेल्या बिलाची रक्कम देणार नाही तुम्हाला काय करायचे ते करा आता तुम्ही माझ्या शहरात आलात तुम्ही जर बिलासाठी माझ्यावर दबाव आणलात तर मी तुम्हाला शहरातून बाहेर पडू देणार नाही अशी धमकी दिली.म्हणून.तपास- सपोनि सोनवणे- **७५८८००१८१८** |